MHND250002202024

| | |
|---|---|
| दाखल केल्याचा दिनांक | –०२.०३.२०२४ |
| नोंदणी केल्याचा दिनांक | –०२.०३.२०२४ |
| पारीत केल्याचा दिनांक | – ०४.०५.२०२६ |
| कालावधी | –वर्ष महिना दिवस<br>०२ ०२ ०२ |

**उमरी येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, उमरी यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी के.एस.कुलकर्णी)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.८२/२०२४**

**नि.क्र.३४**

**भाग–अ**

| | |
|---|---|
| **प्रथम खबर तपशिल** | उमरी पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. १८१/२०२३ चा भा.द.वि. कलम ३४१, ५०६ सहकलम ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. |
| **अभियोगपक्ष** | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत – पोलीस ठाणे अंमलदार,<br>उमरी पोलीस ठाणे, |
| **सरकारी अधिवक्ता** | श्री एन.एम. मगदुम,<br>सहा. सरकारी अभियोक्ता |
| १. | **चंपत दत्तराम हांबर्डे,**<br>वय– ३२ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| २. | **दत्तराम शंकरराव हांबर्डे,**<br>वय– ६५ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ३. | **आनसाजी शंकर हांबर्डे,**<br>वय– ५५ वर्षे, व्यवसाय–शेती. |
| ४. | **मारोती आनसाजी हांबर्डे,**<br>वय– ३१ वर्षे, व्यवसाय–शेती.<br>सर्व रा. बिजेगाव ता. उमरी जि. नांदेड. |
| **आरोपींतर्फे अधिवक्ता** | श्री. अब्दुल कलाम. |

## भाग–ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ३०.०६.२०२३ |
| प्रथम खबरीचा दिनांक | ३०.०६.२०२३ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | ०२.०३.२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १८.०३.२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ३०.१०.२०२५ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०४.०५.२०२६ |
| आदेशाचा दिनांक | --- |

## आरोपींचा तपशिल

| आ. क्र. | आरोपीचे नांव | अटकेची तारीख | जामीनवर मुक्त केल्याची तारीख | आरोप | दोषी अगर निर्दोष | शिक्षा | फौ.प्र.स. चे कलम ४२८ अन्वये करीताचा अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | चंपत दत्तराम हांबर्डे | १७.०७.२०२३ | सीआरपीसी कलम ४१(अ)(१) प्रमाणे | भा.द.वी कलम ३४१, ५०६ सहकलम ३४. | निर्दोष मुक्त | नाही | --- |
| २ | दत्तराम शंकरराव हांबर्डे | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ३ | आनसाजी शंकर हांबर्डे | --- | --- | --- | --- | --- | --- |
| ४ | मारोती आनसाजी हांबर्डे | --- | --- | --- | --- | --- | --- |

## न्यायनिर्णय
## ( पारीत दिनांक ०४ मे, २०२६ )

आरोपींविरुध्द **भारतीय दंड संहितेचे कलम ३४१, ५०६ सहकलम ३४**

प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की,</u>**

२. दिनांक ३०.०३.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता मौजे बिजेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे फिर्यादी पांदन रस्त्याने आउत घेवून शेताकडे जात असतांना आरोपींनी फिर्यादीस 'तु या रस्त्याने जावू नकोस' असे म्हणून आवूत व त्यांना अडवून अंगावर येवून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी मधुकर हंबर्डे व दादाराव हंबर्डे यांनी सोडवा सोडव केली. त्यामुळे फिर्यादी यांनी उमरी पोलीस स्टेशनला घटनेची फिर्याद दिली.

३. त्याप्रमाणे, उमरी पोलीस ठाणे येथे **गुन्हा नोंद क्र. १८१/२०२३** चा **भा.द.वि. कलम ३४१, ५०६ सहकलम ३४** अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो.हे.कॉ आर.एफ. गेडाम/२३५४, उमरी पोलीस स्टेशन यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळाचा पंचनामा व तपासाअंती त्यांनी आरोपींविरुध्द **भा.द.वि कलम ३४१, ५०६ सहकलम ३४** अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द (**नि.क्र.३३**) प्रमाणे **भा.दं.वि. कलम ३४१, ५०६ सहकलम ३४** अन्वये दोषारोप निश्चित केले. आरोपींस दोषारोप त्यांच्या भाषेत वाचून व समजावून सांगितला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले.

५. फिर्यादी यांच्या साक्षी पुराव्यामध्ये आरोपींविरुध्द दोषदर्शित पुरावा मिळून न आल्याने, आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे निवेदन नोंदवण्यात आले नाहीत.

६. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद, उपलब्ध पुरावा यांचे अवलोकन केल्यानंतर खालील मुद्दे माझे विचारासाठी उपस्थित होतात. त्या मुद्दयांवरील निष्कर्ष कारणांसहीत मी खालीलप्रमाणे नमूद करीत आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | दिनांक ३०.०६.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजेच्या सुमारास मौजे बिजेगाव ता. उमरी जि. नांदेड येथे आरोपींनी संगणमत करुन फिर्यादी पांदन रस्त्याने जात असतांना त्यांची अडवणूक करुन त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ३४१ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय? | **नाही.** |
| २. | उपरोक्त कालावधीत व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन फिर्यादीस फौजदारीपात्र धाकदपटशा करुन जिवे मारण्याची धमकी देवून त्यायोगे **भारतीय दंड संहिता कलम ५०६ सहकलम ३४ अन्वये** गुन्हा केला, असे अभियोगपक्षाने सिध्द् केले काय ? | **नाही.** |
| ३. | काय आदेश ? | **आरोपींना दोषमुक्त करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा १ व २ साठीः–**

७. मुद्दा क्र.१ व २ संबंधीत आलेला अभियोगपक्षाचा पुरावा एकसारखा असून संक्षिप्ततेकरिता मुद्दा क्र.१ यांचे मी एकत्रीत विवेचन करुन उत्तर देत आहे.

८. आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने सादर केलेल्या साक्षी पुराव्यांचे विवेचन करण्याआधी एक बाब नमुद करणे आवश्यक वाटते ती म्हणजे फिर्यादी **(सा.क्र.१)** आरोपी यांनी त्यांचेमध्ये आपापसातील भविष्यातील संबंध चांगले रहावेत याकरीता प्रस्तुत प्रकरणात तडजोड झालेली असल्याची पुरसिस **(नि.क्र.२५)** कडे दाखल केलेली आहे. त्यामुळे साक्षी पुरावे हे सदर तडजोडीच्या अनुषंगाने विवेचित करीत आहे.

९. यासंदर्भात, फिर्यादी **(सा.क्र.१)** यांनी त्यांच्या सरतपासादरम्यान दिनांक ३०.०६.२०२३ रोजी त्यांच्यामध्ये व आरोपींमध्ये कुरबुर झाल्याचे कथन केलेले आहे याव्यतीरिक्त काहीही सांगितले नाही. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासादरम्यान

फिर्यादीमधील मजकुर त्यांना माहिती नसल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे त्यांचा साक्षी पुरावा अभियोग पक्षास उपयुक्त ठरत नाही.

१०. कायद्याच्या प्रचलित तत्वानुसार फौजदारी खटल्यांमध्ये आरोपीच्या दोषसिध्दीकरीता साक्षीपुराव्यामधुन अपराधाची बाब निसंशयातीतरीत्या सिध्द होणे अत्यावश्यक आहे. सबब, फिर्यादी **(सा.क्र.१)** यांचा या अनुषंगाने आलेला अभिलेखावरील पुरावा पाहता मी या निष्कर्षाप्रत आलो आहे की, आरोपींवर ठेवलेले आरोप सिध्द होत नाहीत. म्हणुन, मी **मुद्दा क्र. १** व **२** चे उत्तर **नकारार्थी** देत आहे.

**वादप्रश्न क्र. ३ करीताः–**

११. आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप सिध्द न झाल्यामुळे त्यांना खटल्यामधून दोषमुक्त करणे न्यायोचित आहे. सबब, **वादप्रश्न क्र.३** च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपीं क्र.**१. चंपत दत्तराम हांबर्डे, २. दत्तराम शंकरराव हांबर्डे, ३. आनसाजी शंकर हांबर्डे** व **४. मारोती आनसाजी हांबर्डे** यांना **भारतीय दंड संहितचे कलम ३४१, ५०६ सहकलम ३४** अन्वयेच्या दोषारोपातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम २७१(१) अन्वये निर्दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन कदबे व जात मुचलके रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ अनुसार रक्कम **रु.७,५००/– प्रत्येकी** प्रमाणे जात मुचलका व जामीन कदबा द्यावा.

४. जप्त मुद्देमाल काहीही नसल्याने त्याबाबत आदेश नाही.

५. प्रस्तुतच्या न्यायनिर्णयाची प्रत मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना देण्यात

यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर)

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.05.04 14:56:26 +0530

दिनांक- ०४.०५.२०२६ **( के.एस.कुलकर्णी )**
ठिकाण- उमरी न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

## परिशीष्ट

## भाग–क

### अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षाचे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | नि.क्र. | प्रकार |
|---|---|---|---|
| १. | मारोती देवराव पुंडगे | २४ | फिर्यादी |

### अभियोगपक्ष/आरोपीपक्ष/न्यायालयापक्षा यांचे कागदपत्रांची निशाणी यादी

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | तपशिल |
|---|---|---|
| ––– | ––– | ––– |

KULDIP SUBASHRAO KULKARNI
Digitally signed by KULDIP SUBASHRAO KULKARNI
Date: 2026.05.04 14:56:31 +0530

दिनांक- ०४.०५.२०२६ **( के.एस.कुलकर्णी )**
ठिकाण- उमरी न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, उमरी.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word, as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | - | G. B. Wavdhane, Stenographer Gr. III (On Deputation) |
| Court | - | CJJD & JMFC Umri |
| Date | - | 04.05.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | - | 04.05.2026. |
| Order uploaded on | - | 04.05.2026. |